# नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अमरावती

## - संस्थेबद्दल माहिती -

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती या संस्थेअंतर्गत महिला महाविद्यालय कार्यरत आहे. थोर स्वातंत्र्य सेनानी कै. दादासाहेब खापर्डे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात या शिक्षण संस्थेची स्थापना केली. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित असणारे विद्यार्थी घडावे या हेतूने संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेअंतर्गत इ. सन १९२४ साली सर्वप्रथम 'न्यू हायस्कूल मेन' ही शाळा सुरु करण्यात आली. सुरुवातीला तीन शाळा सुरु करण्यात आल्या. इ. सन. १९६५ साली कै. बाबासाहेब खापर्डे यांनी महिलांना उच्च शिक्षण प्रदान करण्याच्या हेतूने महिला महाविद्यालयाची स्थापना केली. नव्या काळाची बदलेली पाऊले ओळखून संस्थेच्या विद्यमान कार्यकारिणीने शैक्षणिक प्रक्रिया व भौतिक सुविधांमध्ये आमुलाग्र बदल करण्याचे ठरविले. संस्थेच्या कार्यकारिणीच्या मार्गदर्शनात प्रभावी शैक्षणिक प्रक्रिया राबविण्यासाठी शैक्षणिक उन्नती समितीची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून तीनही शाळा व महाविद्यालयामध्ये परंपरागत शिक्षण पध्दती व आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घालून शैक्षणिक कार्य केले जाते. या सोबतच सर्व शैक्षणिक संस्थामध्ये आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधा निर्माण करण्यात आल्या. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी प्रसाधन गृहे, विद्यार्थिनींसाठी कॉमन रुम, उपहारगृह, कार्यक्रमासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सुविधा असलेले प्रेक्षागृह, दृकश्राव्य गृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची सुविधा, इमारतीची संपूर्णपणे दुरुस्ती, क्रिडांगणे इत्यादी बदल अल्पावधीत प्रभावीपणे करण्यात आले. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणी द्वारे घेण्यात आलेल्या या सर्व निर्णयामुळे शहराच्या मध्यवस्तीत उच्च प्रतीचे शिक्षण देणारा शैक्षणिक परिसर म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. संस्थेचे संस्थापक कै. दादासाहेब खापर्डे यांनी दिलेला राष्ट्रीय विचार उराशी बाळगून संस्था कार्य करीत आहे. महिला महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना सक्षम व आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने शिक्षण दिले जाईल याची संस्था ग्वाही देत आहे. महिला महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थिनींचे नूतन विदर्भ शिक्षण मंडळ शैक्षणिक परिसरात मनापासून स्वागत.

विनीत

कार्यकारिणी

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती



Principal
Mahila Mahavidyalaya
Amravati